चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०४ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०३/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, चंद्रपुर शहर, वरोरा, भद्रावती, माजरी, सिंदेवाही, पाथरी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१२** गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **५८,१५०/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

# चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

## १)पोलीस स्टेशन बल्लारशाह :—

दिनांक **०३/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत मौजा मोनोरा येथे ०७ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशाह** येथे अप. क्र. **१३४/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०७ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२,०४०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

---

## १)पोलीस स्टेशन दुर्गापुर :—

दिनांक **०३/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **दुर्गापुर** अंतर्गत पायली भटाळी येथे ०४ आरोपी ईसम हे सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **दुर्गापुर** येथे अप. क्र. **३७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०४ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,०३,२८०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **दुर्गापुर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# तब्बल २२ वर्षांपासुन बेपत्ता असलेल्या वडीलांची कोठारी पोलीसांच्या प्रयत्नामुळे त्यांच्या घरच्यांसोबत झाली भेट :

कोठारी ता. बल्लारपुर येथील रहिवासी असलेले राजाराम पोचुजी बोनगिरवार वय ४१ वर्ष हे गृहस्थ १९९८ साली अचानक बेपत्ता झाले त्यांचा बराच शोध घेतल्यानंतर मिळुन न आल्याने त्यांचे कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन कोठारी येथे बेपत्ता असल्याबाबत रिपोर्ट दिला होता. परंतु पोलीस व कुटंब यांचे शोधा नंतरही राजाराम मिळुन आले नव्हते.

अशातच सुमारे आठ दिवसापुर्वी कोलकत्ता कॉकद्विप येथील रहिवासी अम्रीश नागबिश्वास यांचा कोठारी ठाणेदार श्री संतोष अंबिके यांचे सोबत संपर्क झाला व अंब्रीश विस्वास यांना ठाणेदार यांना सांगीतले की, मकरसंक्रांती मेळाव्यात गंगासागर येथे एक वृध्द व्यक्ती आजारी पडलेली आढळली असुन या वृध्दाकडे विचारपुस केली तर तो वृध्द फक्त कोठारी एचढेच सांगत आहे मी इंटरनेटद्वारे माहिती घेतली असता कोठारी बाबत माहिती मिळाली. अशा माहितीवरून ठाणेदार पोस्टे कोठारी यांनी पोलीसांचे नजरेतुन प्रकरणाचे गांभीर्य समजुन जुने रेकार्ड शोधले असता १९९८ साली बेपत्ता झालेले राजाराम बोनगिरवार हे बेपत्ता असल्याचे दिसुन आले तेव्हा याबदद्ल ठाणेदार यांनी अंब्रीश बिस्वास यांना माहिती दिली. सर्व चौकशी नंतर सदर व्यक्ती राजाराम बोनगिरवार आहेत हे स्पष्ट झाले. सदर प्रकरणाची माहीती पोलीस अधीक्षक यांना मिळताच त्यांनी तात्काळ पोलीस पथक कोलकत्ता येथे रवाना केले. कोलकत्ता येथे तपास पथक पोहचताच राजाराम बोनगिरवार यांना सुखरुप ताब्यात घेवुन पोलीसांनी त्यांना दिनांक ०३/०२/२०१९ रोजी चंद्रपुर येथे आणले. मानसीक अस्वस्थता मुळे राजराम बोनगिरवार हे गेली २२ वर्षे आपले घरदार, संसार सोडुन भटकत राहिले.

अखेर २२ वर्षानंतर पोलीस अधीक्षक यांचे उपस्थितीत पुष्पगुच्छ व शालश्रीफळ देवुन राजाराम यांना दिनांक ०३/०२/२०१९ रोजी संध्याकाळी त्यांचे नातेवाईकांकडे सुखरुप सुपुर्त करण्यात आले. तेव्हा त्यांच्या कुटंबियांच्या डोळयात आंनदाश्रु आले होते. २२ वर्षानंतर घरातील व्यक्ती परत मिळाल्याने बोनगिरवार कुटंबियांच्या घरी वेगळे भावनीक आनंदाचे वातावरण आहे. सदरची उत्कृष्ठ कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात श्री.शेखर देशमुख उपविभागीय पोलीस अधिकारी, राजुरा यांचे नेतृत्वात पोहवा. श्यामराव पुलगमकर पोलीस शिपाई विनोद निखाडे यांनी केली आहे.

---